Estd. 1962
"A++" Accredited by
NAAC(2021)with CGPA3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## परिपत्रक

**संदर्भ :- आस्थापना विभागाचे परीपत्रक जा.क्र. आस्थापना / ७५९, दि.२८ सप्टेंबर, २०२१**

विद्यापीठातील वेतन अनुदान योजनेखालील वर्ग ४ मधील जे सेवक सामान्य प्रशासन विभागाचे दि.०६/०६/२०१७ व दि.११/०६/२०१९ रोजीच्या अधिसूचनेनुसार शैक्षणिक अर्हता धारण करीत आहेत. तसेच वर्ग-४ मधील जे सेवक वर्ग-३ मधील कनिष्ठ सहायक पदावर काम करण्यास इच्छूक आहेत, अशा सेवकांची सेवाजेष्ठता यादी तयार करण्याच्या अनुषंगाने आस्थापना विभागाच्या दि.२८/०९/२०२१ रोजीच्या परीपत्रकान्वये दि.१६/१०/२०२१ पर्यंत अर्ज मागविण्यात आले होते.

सदर परीपत्रकामध्ये मराठी टंकलेखनाचे किमान ३० शब्द प्रति मिनिट वेगमर्यादेचे किंवा इंग्रजी टंकलेखनाचे किमान ४० शब्द प्रति मिनिट वेगमर्यादेचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र किंवा संगणक टंकलेखन ही शैक्षणिक अर्हता असणाऱ्या सेवकांनीच सामान्य प्रशासन विभागाच्या दि.०६/०६/२०१७ व दि.११/०६/२०१९ रोजीच्या अधिसूचनेनुसर अर्ज करणे बंधनकारक होते.

तथापि, मराठी टंकलेखनाचे किमान ३० शब्द प्रति मिनिट वेगमर्यादेचे किंवा इंग्रजी टंकलेखनाचे किमान ४० शब्द प्रति मिनिट वेगमर्यादेचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र किंवा संगणक टंकलेखनाचे प्रमाणपत्र दोन वर्षाच्या परीविक्षाधीन कालावधीमध्ये सादर करण्याबाबतचे हमीपत्र घेऊन वर्ग ४ मधून वर्ग ३ मधील कनिष्ठ सहायक पदाच्या पदोन्नतीसाठी पात्र ठरविण्यास शासन मान्यतेच्या अधीन राहून विद्यापीठ अधिकार मंडळाने मान्यता दिली आहे.

विद्यापीठ अधिकार मंडळाच्या ठरावानुसार पदोन्नतीची कार्यवाही करण्यात येईल. तथापि पदोन्नती देण्यात येणाऱ्या सेवकांना शासनाच्या अंतीम मान्यतेनंतर पदोन्नती पदाचे वेतन लागू करण्यात येईल.

सबब, वर्ग-४ मधील जे सेवक वर्ग-३ मधील कनिष्ठ सहायक पदावर काम करण्यास इच्छूक आहेत, **अशा सेवकांनी दि.----10 FEB 2022---- पर्यंत कार्यालयीन वेळेत अर्ज सादर करावेत.**

जे सेवक मुदतीत अर्ज सादर करणार नाहीत त्यांचा सेवाजेष्ठता यादीसाठी विचार केला जाणार नाही, याची संबंधित सेवाकांनी नोंद घ्यावी.

तसेच ज्या कर्मचाऱ्यांनी दि.२८ सप्टेंबर, २०२१ रोजीच्या परिपत्रकामध्ये नमूद केलेल्या अटी ह्या आहे तशाच लागू राहतील. ज्या सेवकांनी सदर परिपत्रकाच्या अनुषंगाने कार्यालयास अर्ज सादर केला आहे. अशा सेवकांनी पुनश्च: अर्ज करण्याची आवश्यक नाही. याची नोंद घ्यावी.

प्र. कुलसचिव

जा.क्र. आस्थापना / 129

दिनांक :- 21 JAN 2022

प्रति,

१. स्वीय सहाय्यक - मा.कुलगुरू, मा.प्र-कुलगुरू, मा.कुलसचिव, मा.संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ व मा. वित्त व लेखा अधिकारी यांना माहितीसाठी.
२. सर्व अधिविभाग प्रमुख, संचालक, समन्वयक.
३. सर्व उपकुलसचिव, कायदा अधिकारी, जनसंपर्क अधिकारी, सहा.कुलसचिव व समकक्ष अधिकारी
४. इंटरनेट विभाग - सदरचे परिपत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.

**टीप :- सदरचे परिपत्रक आपल्या विभागातील सर्व वर्ग ४ मधील सेवकांच्या निदर्शनास आणावे.**